ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

# शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी शासनाचा पुढाकार

** श्रीमती गायत्री श्रीनिवास जाधव*

** श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली.*

**प्रस्तावना:**

कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या राष्ट्रातील शिक्षणाच्या प्रसारावर अवलंबून असतो. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये दुर्लक्षित असलेल्या घटकांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे होते आणि म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी भारत शासनाने विविध योजना राबवल्या.विविध समित्या व आयोगाची स्थापना करण्यात आली तसेच विविध आयोगांनी दिलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करत असताना सर्वांसाठी शिक्षण हे धोरण शासनाने राबवलेले दिसते. स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, आदिवासींचे शिक्षण, वंचित व दुर्बल घटकांचे शिक्षण यावर विविध आयोगांनी केलेल्या शिफारशींचा गांभीर्याने विचार राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर करण्यात आला. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुदी करण्यात आल्या. विविध शिष्यवृत्ती व सवलती वेळोवेळी शासनातर्फे जाहीर करण्यात आल्या. तळागाळातील व्यक्तींपर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहोचवण्यासाठी मोफत व सक्तीचे शिक्षण, मध्यान्न भोजन योजना, मोफत प्रवास, मोफत गणवेश, शिष्यवृत्ती अशा विविध तरतुदींच्या सहाय्याने वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करण्यात आले. शासनाने केलेल्या विविध प्रयत्नांच्या आधाराने समाजामध्ये शिक्षणाच्या बाबतीत असणारी असमानता दूर होण्यासाठी बऱ्यापैकी मदत झालेली आहे.समाजातील विविध घटक शिक्षणाच्या प्रवाहामध्ये यायला मदत झालेली आहे.

**Copyright © 2024 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

**उद्दिष्टे:**

1. शिक्षणामध्ये असणाऱ्या असमानतेचा शोध घेणे
2. शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी विविध आयोगांनी केलेल्या शिफारसी अभ्यासणे
3. शिक्षणातील असमानता दूर करण्यासाठी शासनाने केलेल्या तरतुदींचा आढावा घेणे.

**विषय विवेचन:** भारतीय समाज हा परंपराधिष्ठीत समाज म्हणून ओळखला जातो.समाजामध्ये असणाऱ्या इष्ट परंपरांबरोबरच काही अनिष्ट परंपरांचा प्रभाव हा दीर्घकाळ भारतीय समाजावर राहिलेला आहे. समाजामध्ये असणारी जातीव्यवस्था तसेच

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

स्त्रियांचा दुय्यम दर्जा याचा परिणाम वंचित दुर्बल घटक तसेच स्त्रियांच्या शिक्षणावर खोलवर झालेला पाहायला मिळतो.आजही भारतामध्ये अशा अनेक जाती जमाती आहेत ज्यामध्ये बहुतांश लोक हे अशिक्षित आहेत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत.स्त्रियांच्या विशेष करून मुलींच्या सुरक्षिततेच्या कारणावरून तसेच रुढीपरंपरांच्या जोखडामुळे स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष झालेले आहे.आजही भारतामध्ये सुशिक्षित पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे.तसेच आदिवासी व भटक्या जाती जमातींमध्ये ही शिक्षणाचा म्हणावा तेवढा प्रसार झालेला दिसून येत नाही.स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी भारत शासनाने विविध आयोग व समित्यांची स्थापना केली त्यापैकी काही महत्त्वाच्या आयोगाच्या शिफारशीव या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने केलेल्या तरतुदी यांचा आढावा पुढे घेतलेला आहे

**विद्यापीठ शिक्षण आयोग(राधाकृष्णन आयोग)1948-1949: शिफारशी**

- शिष्यवृत्ती सुरू कराव्यात.
- व्यावसायिक शिक्षणासाठी पुढाकार घ्यावा.
- बहुजनांचा विचार करून शेती व शेतीशी संबंधित व्यवसायांचा अभ्यासक्रमात समावेश करावा.
- धार्मिक शिक्षण तसेच प्रादेशिक व विविध भारतीय भाषांमधून शिक्षण दिले जावे.
- स्त्री शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सुविधा वाढविण्यावर भर.
- ग्रामीण भागांमध्ये विद्यापीठांची स्थापना करावी.

**अंमलबजावणी:**

- उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी 1950 नंतर भारतामध्ये विविध विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांची स्थापना करण्यात आली. 1950 मध्ये भारतामध्ये केवळ 27 विद्यापीठे होती तर ती संख्या वाढवून 1995 पर्यंत 219 इतकी झालेली पाहायला मिळते. तर 2023 मध्ये ही संख्या 5350 इतकी प्रचंड झालेली पाहायला मिळते.
- याचाच परिणाम म्हणून बहुजन समाजाला उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झालेल्या आहेत. उच्च शिक्षण सामान्य पर्यंत पोहोचण्यासाठी मदत झालेली आहे.

**माध्यमिक शिक्षण आयोग (मुदलियार आयोग)1952 -1953: शिफारशी**

- बहुउद्देशीय शाळांची स्थापना करावी.
- वसतिगृहांची सोय

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

- निवासी शाळांची सोय करावी.
- मुलींच्या स्वतंत्र शाळांची स्थापना.
- मातृभाषेतून शिक्षण द्यावे.
- आवश्यक त्या भौतिक सोयी सुविधांमध्ये वाढ करावी.
- व्यावसायिक शिक्षणावर भर द्यावा.

**अंमलबजावणी:**

- बहुउद्देशीय शाळांची स्थापना करण्यात आली.
- व्यावसायिक मार्गदर्शन मंडळांची स्थापना करण्यात आली.

**कोठारी आयोग (भारतीय शिक्षण आयोग) 1964- 1966: शिफारशी**

- शैक्षणिक शुल्क रद्द करावे.
- उच्च शिक्षणाची फी 30 टक्के कमी करावी.
- पुस्तके, लेखन साहित्य मोफत दिले जावे.
- शिष्यवृत्यांची सोय करावी.
- विद्यार्थ्यांना प्रवास खर्च देण्यात यावा, अभ्यासिका सुरू कराव्यात तसेच निवासाची सोय करावी.
- अपंग शिक्षणावर भर दिला जावा.
- केंद्र व प्रत्येक राज्यामध्ये महिला व मुलींच्या शिक्षणाचे स्वतंत्र विभाग असावेत.
- मागासवर्ग आणि आदिवासींचे शिक्षण यासाठी प्रयत्न केले जावेत तसेच भटक्या व विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना करावी.

**अंमलबजावणी:**

- उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण करण्यात आले.
- सर्व क्षेत्रांमध्ये शिष्यवृत्ती मध्ये वाढ करण्यात आली.
- प्रौढ शिक्षणावर विशेष भर देण्यात आला.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

- वंचित व दुर्बल यांचे शिक्षण तसेच स्त्री शिक्षणासाठी भरीव प्रयत्न करण्यात आले.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1968: शिफारशी**

- वय वर्षे 14 पर्यंतच्या सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण दिले जावे.
- सर्वसामान्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी प्रादेशिक भाषांमधून शिक्षण द्यावे.
- शिक्षण सुविधांबाबत प्रादेशिक असमतोल दूर करून ग्रामीण आणि मागासलेल्या भागांमध्ये शिक्षणाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
- मुलींच्या शिक्षणावर विशेष भर दिला जावा.
- मागासवर्ग आदिवासी जाती जमाती अपंग आणि मानसिक दृष्ट्या दुर्बल मुलांच्या शैक्षणिक सुविधांमध्ये वृद्धी व्हावी.

**अंमलबजावणी:**

- विद्यापीठ स्तरावरील शिक्षण प्रादेशिक भाषेमधून दिले जाऊ लागले.
- शिक्षणामधील प्रादेशिक असमतोल दूर करण्याचे प्रयत्न करण्यात आले.
- मुलींचे आणि मागास जाती-जमातींचे शिक्षण यासंदर्भात विशेष तरतुदी करण्यात आल्या.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1986: शिफारशी**

- शिक्षणापासून वंचित महिलांसाठी प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले जाईल व त्यांच्यासाठी नोकरी रोजगाराची तरतूद केली जाईल.
- अनुसूचित जातींच्या शिक्षणासाठी पहिलीच्या वर्गापासून शिष्यवृत्ती स्थगन आणि गळती रोखण्यासाठी नियोजन नोकरी व रोजगार उपयोगी अभ्यासक्रम वसतिगृहांमध्ये सुविधा या बाबींना प्राधान्य दिले जाईल.
- आदिवासींच्या शिक्षणासाठी त्यांच्या क्षेत्रातच प्राथमिक शाळा उघडले जातील तसेच त्यांच्या बोलीभाषेतून अभ्यासक्रम व अध्ययन साहित्यांची निर्मिती केली जाईल.
- अल्पसंख्यांकांना त्यांची संस्कृती आणि भाषा अबाधित ठेवून शिक्षण प्राप्तीची संधी उपलब्ध करून दिली जाईल.
- शारीरिक व मानसिक दृष्ट्या अपंगांना शिक्षणासाठी समावेशन किंवा स्वतंत्र शाळा उघडले जातील.
- प्रौढ शिक्षण कार्यक्रमाद्वारे प्रौढांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले जातील.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

**अंमलबजावणी:**

- नवोदय विद्यालयांची स्थापना करण्यात आली.
- वंचित घटक जसे की महिला आदिवासी अल्पसंख्यांक अनुसूचित जाती जमाती तसेच प्रौढ शिक्षणासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या.
- प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी खडू फळा मोहीम अनोपचारिक शिक्षण कार्यक्रम राबविण्यात आले.

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2005: शिफारशी**

- लिंगसमभावावर आधारित अभ्यासक्रम रचना.
- समावेशित शिक्षणावर भर.

**अंमलबजावणी:**

- एनसीएफ 2005 नुसार अभ्यासक्रमामध्ये आमुलाग्र बदल घडून आले. आजचा अभ्यासक्रम हा ज्ञानरचनावादावर आधारित असून लिंगसमभावाला प्रोत्साहन देणारा आहे.
- सद्यस्थितीमध्ये समावेशित शिक्षणावरती विशेष भर देण्यात आलेला आहे. समावेशित शिक्षणासाठी विविध सुविधा शासनाकडून शालेय स्तरावर पुरविल्या जात आहेत.

**शिक्षणाचा हक्क कायदा (RTE) 2009: शिफारशी व अंमलबजावणी**

- ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा पुरविणे.
- मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार.
- वयानुरूप प्रवेश
- स्थलांतरित कुटुंबांच्या बालकांना त्वरित प्रवेश मिळण्याची संधी उपलब्ध करून देणे.
- शासनाकडून मदत घेणाऱ्या शाळांनी 25 टक्के बालकांना मोफत शिक्षण पुरविणे बंधनकारक. तसेच अशा शाळांमध्ये 25% दुर्बल वंचित घटकातील बालकांना पूर्व प्राथमिक शाळेमध्ये मोफत प्रवेश द्यावा.
- वयाच्या पुराव्या अभावी कोणत्याही बालकाला प्रवेश नाकारता येणार नाही.
- RTE 2009 मध्ये केलेल्या सर्व शिफारशींची अंमलबजावणी सध्या शालेय शिक्षणामध्ये अनिवार्य करण्यात आली

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

आहे त्याप्रमाणे प्रवेशाच्या समस्या बऱ्याच अंशी निकालात निघालेल्या आहेत.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP 2020: शिफारशी**

- आर्थिक दृष्ट्या वंचित भागांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांचे प्रमाण 25:1 ठेवण्याचा प्रयत्न करणे.
- प्रभावी व पायाभूत सुविधा पुरविणे जेणेकरून विद्यार्थी शाळेमध्ये टिकून राहतील.
- सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित घटकांसाठीऔपचारिक व अनौपचारिक शिक्षण पद्धतींचा वापर करण्यात येईल.
- अभ्यासक्रम निवडीमध्ये लवचिकता.
- प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून दिले जावे
- विशेष गरजा असलेल्या तसेच दिव्यांग मुलांसाठी दर्जेदार शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे.
- अल्पसंख्यांकांच्या मुलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करणे.
- सर्व मुलींना न्याय आणि गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याची हमी देणे.
- ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी 'लिंग समावेश निधी' उपलब्ध करून देणे.
- सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित मुलांसाठी सुरक्षित व सर्व सोयींनी युक्त वसतिगृहांची स्थापना.
- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय मुलींच्या शिक्षणासाठी सुसज्ज केली जातील.
- दिव्यांग मुलांचे समावेशन करण्यासाठी शाळांमध्ये आवश्यक त्या भौतिक सोयी सुविधांची उपलब्धता.
- शैक्षणिक दृष्ट्या अक्षम विद्यार्थ्यांना प्रवेश व संधी मिळण्यासाठी नवीन राष्ट्रीय मूल्यांकन केंद्र 'परख' तसेच इतर मूल्यांकन व प्रमाणन संस्था मार्गदर्शक तत्वे घालून देतील.
- अनुसूचित जाती जमातीच्या शिक्षणातील तफावत दूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.
- बहुविद्याशाखीय दृष्टिकोनातून शिक्षणाच्या संधीची उपलब्धता.

शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी वरील महत्त्वपूर्ण शिफारशी NEP 2020 मध्ये करण्यात आलेल्या आहेत. वरील शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे धोरण शासन सर्व स्तरांवर राबवत आहे त्या अनुषंगाने विद्यापीठ तसेच शालेय शिक्षणामध्ये आवश्यक ते बदल घडवून आणण्यासाठी चे प्रयत्न सध्या सुरू आहेत.

वरील विविध आयोगांच्या शिफारशी तसेच त्यांची करण्यात आलेली अंमलबजावणी यातून शासनाने शिक्षणातील

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–XI, ISSUE– II MARCH – APRIL 2024

Original Research Article

असमानता कमी करण्यासाठी केलेल्या तरतुदी पाहायला मिळतात शासनाने बऱ्याच पातळीवर असे प्रयत्न केलेले असले तरी आजही भारताचा साक्षरता दर हा 74.04% इतकाच आहे. ज्यामध्ये पुरुषांची साक्षरता 82.14% तर महिलांची साक्षरता 65.46% इतकी आहे. शिक्षणासाठी नेमलेले विविध आयोग समित्या तसेच शासनाकडून केले गेलेले प्रयत्न जरी दिसत असले तरी त्याचा परिणाम मात्र साक्षरता दर वाढीवर तितक्या वेगाने दिसून येत नाही. लोकसंख्येमध्ये 50 टक्के वाटा असणाऱ्या स्त्रियांचा साक्षरता दर आजही तुलनेने खूपच कमी असलेला पाहायला मिळतो. म्हणूनच एनी पी ट्वेंटी-ट्वेंटी मध्ये केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी पूर्ण क्षमतेने होणे आवश्यक आहे जेणेकरून शिक्षणातील समानता साधता येईल.

**संदर्भ ग्रंथ:**

1. *वास्कर, आनंद व वास्कर पुष्पा (1998).भारतीय शिक्षणाचे बहुजनिकरण. पुणे: नूतन प्रकाशन.*
2. *नरवणे, मीनल (2010). भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या. पुणे: नित्य नूतन प्रकाशन.*
3. *जाधव, मोहन व भोसले, आरती आणि सरपोतदार,प्राची (2006). भारतीय शिक्षणाचा विकास. कोल्हापूर: फडके प्रकाशन.*
4. *मानकर, सुधाकर(2020). उच्च शिक्षण विषयक नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण. कोल्हापूर: अतुल पब्लिकेशन्स.*
5. *https://www.education.gov.in*

*Cite This Article:*

***श्रीमती जाधव गा. श्री.* (2024).** *शिक्षणातील असमानता कमी करण्यासाठी शासनाचा पुढाकार.* In Educreator Research Journal: Vol. XI (Number II, pp. 246–252). **ERJ.** ***https://doi.org/10.5281/zenodo.10908229***